
# कंकालेश्वरच्या जमिनीवरील अतिक्रमणावर बुलडोजर फिरवून गुन्हे दाखल होणार?

## शंभर रूपयाच्या बॉण्डवर जमीन विकणाऱ्यांमध्ये घबराहट; कोणत्याही क्षणी कारवाई होणार



बीड (सरकार): कंकालेश्वर जमिनीवर अतिक्रमण करून राहणाऱ्या लोकांनी शंभर रूपयांच्या बॉण्डवर काही भूमाफियांनी जमिनी देऊन टाकल्या. आणि अशी अतिक्रमण वाढत जाऊन भूमाफिया कोट्याधीश झाले. मात्र दोन सुनावणीत शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकणाऱ्यांमध्ये घबराहट झाली. त्यामुळे आता कोणत्याही क्षणी अतिक्रमणावर बुलडोझर फिरविण्याची तयारी प्रशासन करत आहे. मात्र ज्यांनी शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकल्या त्यांच्यावर मोठी कारवाई होणार असल्याची दबक्या आवाजात चर्चा चालू आहे.

बीड येथील कंकालेश्वर मंदिराच्या ५५ एकर जमिनीपैकी काही जमिनीवर भूमाफियाने ही जमीन आपल्या बापदादाची आहे असे समजून शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकल्या आणि कोट्याधीश झाले. काही संभाजीनगरला गेले तर काही बीडमध्ये राहत असलेल्या या भूमाफियाने या गरीब लोकांकडून अमाप पैसा कमाविला आणि आता येथील नागरीकांनी आमचे पैसे परत द्या असे म्हटल्यानंतर या भूमाफियामध्ये घबराहट निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाकडून या अतिक्रणा संदर्भात आणि शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकण्याची सुनावणी झाली असून तिसऱ्या सुनावणीत प्रशासन बूलडोजर फिरवरून गुन्हा दाखल करण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे येथील अतिकम्रण धारकांनी आता ज्यांच्याकडून शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी बहाल केल्या त्यांना पैसे मागण्यासाठी तगादा लावला आहे. त्यामुळे आता शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकणाऱ्यांमध्ये घबराहट निर्माण झाली असून कोणत्याही क्षणी अतिक्रमणावर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे बोलले जात आहे.




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २१८ वा ■ शुक्रवार २५ एप्रिल २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २६ एप्रिल २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 218 ■ Friday 25 April 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027



## लाडक्या बहिणींना पुन्हा महायुती सरकारचा धक्का

# चारचाकी वाहन असलेल्या महिलांचा हप्ता होणार बंद?

मुंबई (सरकार) मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या निकषांनुसार चारचाकी वाहन असलेल्या लाडक्या बहिणींसह एकापेक्षा अधिक वैयक्तिक योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांचा शोध घेण्यात आला आहे. आता पुढच्या टप्प्यात वार्षिक अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असूनही योजनेचा लाभ घेणाऱ्या लाडक्या बहिणींची पडताळणी केली जाणार आहे. त्यानुसार अपात्र लाडक्या बहिणींचा लाभ बंद करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. निवडणूक काही दिवसांवर असल्याने ज्यांनी अर्ज केले, त्या महिलांच्या अर्जाची निकषांच्या आधारे काटेकोर पडताळणी होऊ शकली नाही. दोन महिन्यांत जिल्ह्यातील साडेअकरा लाखाहून अधिक महिलांनी या योजनेच्या लाभासाठी अर्ज केले.

पण, अपेक्षेपेक्षा जास्त अर्ज आल्याने सरकारच्या तिजोरीवर अतिरिक्त ताण



आला आणि अन्य योजनांचा बराच निधी या योजनेसाठी वळता करावा लागला. दुसरीकडे बारा लाखाहून अधिक महिलांच्या कुटुंबांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असू शकते का, याचे उत्तर सरकार शोधू लागले आहे. आतापर्यंत राज्यात दोन कोटीपैकी १२ लाखांहून अधिक महिलांचा लाभबंद करण्यात आला असून केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी सन्मान निधीचा लाभघेणाऱ्या लाडक्या बहिणींचा लाभ कमी केला आहे.

आता शेवटच्या टप्प्यात योजनेतील लाभार्थी आधारलिंक करून आयकर कडील माहितीनुसार अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिलांचा शोध राज्यस्तरावरुनच घेतला जात असल्याचेही सांगण्यात आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभासाठी लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असावे अशी अट आहे. त्यानुसार आतापर्यंत लाभार्थी महिलांच्या वार्षिक उत्पन्नाची पडताळणी अजूनपर्यंत झालेली नाही. त्यामुळे आयकर विभागाकडून त्यासंबंधीची माहिती मागविण्यात आली असून आधार व पॅनकार्डच्या आधारे त्या कुटुंबांचा शोध घेतला जाणार आहे. त्यानंतर अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिला योजनेतून वगळण्यात येणार आहेत. दरम्यान, स्थानिक पातळीवी अद्याप कोणत्याही अधिकाऱ्यांकडे ही माहिती नाही. किंवा त्यांना त्यासंबंधीचे कोणतेही आदेश नसल्याचे सांगण्यात आले आहे.

## अवैध वाळुची वाहतुक करणारा ट्रॅक्टर जप्त

### माजलगाव ग्रामिण पोलीसांची कारवाई

माजलगाव (सरकार) माजलगाव तालुक्यातील ईरला मजरा येथील सिंधफना नदी पात्रातुन वाळुचा अवैध उपसा करुन त्याची वाहतुक करणारा ट्रॅक्टर माजलगाव ग्रामिण पोलीस पथक गस्तीवर असताना आढळुन आल्याने तो जप्त करुन संबंधित आरोपी नामे योगेश आसाराम काटवटे याला ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे.

प्रकरणी पोह उद्धव मदनराव राऊत यांनी ग्रामिण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरुन त्यांच्या सह पोलीस पथक २३एप्रिल बुधवार रोजी च्या पहाटे ४वा च्या सुमारास



ईरला मजरा गावा नजीक गस्तीवर असताना त्या गावाच्या शिवारातील सिंधफना नदी पात्रातुन वाळुचा अवैध उपसा करुन त्याची महिंद्रा अर्जुन अलट्रा ५५५, विना नंबर हेड,ट्रॉली मधुन आरोपी योगेश आसाराम काटवटे वाहतुक करत असल्याचे आढळुन आल्याने ट्रॅक्टर जप्त करुन नमुद आरोपी विरोधात भान्यासं कलम ३०३सह मोटार वाहन अधिनियम कायद्याच्या कलम ५०/१७७प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव तहसीलदार माजलगाव यांच्या कडे सादर केला असल्याच सांगितले जाते.

## गरीब जनतेच्या नावाखाली पैसे घेऊन बीड तालुका कामगार मंडळाचे हात बरबटलेले-प्रा.सापनकर

बीड (सरकार): वयोवृद्ध माणसांना आपण माय मायबोलीप्रमाणे वागवतो. मानसन्मान करतो. आमचा आवाज हा फक्त जनतेसाठी आहे. आम्हाला न्याय मिळावा. म्हणून आम्ही सदैव जनतेसाठी तत्पर आहोत. गरीब जनतेच्या नावाखाली पैसे घेऊन बीड तालुका कामगार मंडळाचे हात बरबटलेल आहेत. जर यावर लवकरच योग्य तो निर्णय नाही दिला तर बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषण केल्या शिवाय राहणार नाही असं इशारा प्रा बाळासाहेब सापनकर सर राष्ट्रीय समाज पक्ष बीड जिल्हा यांनी दिला आहे


तालुका कामगार सेतू केंद्रातील कर्मचाऱ्याकडून वृद्ध महिलांना अरे रवीच्या भाषेमध्ये बोलण व जिल्हा कामगार अधिकारी श्री श्रीहरी मुंडे व कामगार मंडळाचे राज्याचे सचिव विवेक कुंभार हे पाठराखण करतात म्हणून हे खालाचे कार्मचारी जनता चा गैरफायदा घेतात व असं बोलतात कि सचिव आमचं जवळ नातलग आहेत त्या मुळे आमचं कोणी काही करू शकत नाही श्री प्रवीण सुरवसे व तुषार कुंभार नामक कंत्राटी कर्मचारी येणाऱ्या वृद्ध कामगारांसोबत अतिशय उद्धटपणे वागतात तरी पण जिल्हा कामगार अधिकारी काही करू शकत नाही कारण श्री श्रीहरी मुंडे मानतात कि हे दोघांच्या विषय मला बोलू नका हे सचिवांचे माणसं आहेत गोरगरीब जनतेचे पैसे घेऊन अरेरावीची भाषा बोलतात बीड जिल्हा मध्ये कामगार मंडळ यांच बोगस कारभार चालू आहे साहित्य वाटप करताना पैसे घेईयचं



रिनवल करायचा असेल तरी पैसे घेईयचं सर्रासपणे भोंगळा कारभार सुरू आता पर्यंत खुप लोकांनी तक्रार करून सुद्धा काही केले नाही जिल्हाधिकारी साहेबांना अनेक निवेदन देऊन सुद्धा या कर्मचाऱ्यांना फारक पडत नाही कंत्राटी कर्मचारी पासून जिल्हा कामगार अधिकारी व सचिव ना पैसे भेटतात म्हणून या वयोवृद्ध माणसांना आपण माय मायबोलीप्रमाणे वागवतो. मानसन्मान करतो. पण आज बीडमध्ये वातावरण एवढंच चिघळलेला असताना. त्यांना सुद्धा वर या घाणेरड्या वर्तणूक केला सामोर जावं लागतं. आई बहिणीवर शिव्या देतात. पैसे खाल्ल्याशिवाय एकही काम किंवा एकही कागद पुढे सरकवला जात नाही. म्हणजे गरिबांचे काम राहिली बाजूला. प्रत्येक कागदा माग यांचे पन्नास शंभर रुपये घेतल्याशिवाय कागद पुढे सरकत नाही. तो कागद कमीत कमी सात-आठ जणांच्या हाताखाली जात असतो. आतापर्यंत कंत्राटी कामगारांनी किती जणांची फसवणूक केलेली आहे हे सांगू शकत नाही. पण जनसामान्यांना न्याय करून देणार त्यासाठी आम्ही एकजुटीने लढत आहोत. आमचा आवाज हा फक्त जनतेसाठी आहे. आम्हाला न्याय मिळावा. म्हणून आम्ही सदैव जनतेसाठी तत्पर आहोत. जर यावर लवकरच योग्य तो निर्णय नाही दिला तर बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषण केल्या शिवाय राहणार नाही असं इशारा प्रा बाळासाहेब सापनकर सर राष्ट्रीय समाज पक्ष बीड जिल्हा यांनी दिला आहे.

## ४ दिवस 'या' बँका बंद राहणार!

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): एप्रिल महिना संपायला आता काही दिवस उरले आहेत. मे महिन्याची सुरुवात होण्याआधी तुम्ही बँकेतील काही कामे संपवण्याचा विचार करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी उपयुक्त आहे. अनेकदा आपण बँकेत पोहचतो आणि कळतं की आज बँक बंद आहे. अशी गैरसोय टाळण्यासाठी तुमच्या परिसरातील बँकांना कधी सुट्टी आहेत, हे माहिती असणे आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेच्या सुट्टीच्या कॅलेंडरनुसार, उद्यापासून ३० तारखेपर्यंत पुढील ४ दिवस विविध कारणांमुळे बँका बंद राहतील. या बँक सुट्ट्या सर्व बँकांमध्ये लागू होणार नाहीत. त्यामुळे तुमच्या बँकेचं यात नाव आहे का? हे तपासून घ्या.



उद्या म्हणजेच २६ एप्रिल रोजी चौथा शनिवार असल्याने देशभरातील बँका बंद राहतील. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (ठइख) च्या नियमांनुसार, दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी देशभरातील बँका बंद राहतील. त्यामुळे या दिवशी सर्व राज्यांमध्ये बँका बंद राहतील. यानंतर, २७ एप्रिल रोजी रविवारची सुट्टी असल्याने बँका बंद राहतील. ही बँकेची नियमित साप्ताहिक सुट्टी आहे. या दिवशीही देशभरातील सर्व बँका बंद राहतील.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात


## पाकिस्तानी नागरिकांची झाडाझडती

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने अत्यंत आक्रमक पवित्रा घेताना पाकिस्तानी नागरिकांना दिलेले सर्व व्हिसा रद्द केले आहेत. तसेच आपल्या नागरिकांना पाकिस्तानात प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. पहलगाममध्ये निष्पाप २६ पर्यटकांची हत्या करण्यात आल्यानंतर देशात संतापाची लाट पसरली आहे. भारताने १९६० मधील सिंधू जल करार रद्द केला आहे. अटारी येथील एकमेव कार्यरत जमीन सीमा क्रॉसिंग सुद्धा बंद केलं आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा मंत्रिमंडळ समितीने (सीसीएस) गुरुवारी घेतलेल्या निर्णयांचाच एक भाग असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. भारत सरकारने तत्काळ प्रभावाने पाकिस्तानी नागरिकांना व्हिसा सेवा निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे, असे मंत्रालयाने म्हटले आहे. पाकिस्तानी नागरिकांना दिलेले सर्व वैध व्हिसा २७ एप्रिलपासून रद्द करण्यात आले आहेत, तर पाकिस्तानी नागरिकांना दिलेले वैद्यकीय व्हिसा २९ एप्रिलपर्यंत वैध राहतील, असे मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. भारतात सध्या असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांना व्हिसाची मुदत संपण्यापूर्वी भारत सोडावे लागेल, असे मंत्रालयाने म्हटले आहे. दरम्यान, वैध भारतीय व्हिसा असलेल्या पाकिस्तानींची नेमकी संख्या किंवा सध्या पाकिस्तानमध्ये असलेल्या भारतीयांची संख्या त्वरित निश्चित करता येत नाही. तथापि, जिल्हानिहाय देशात किती पाकिस्तानी आहेत याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून घेतली जात आहे.

## राज्यातील केवळ ७७ हजार शाळांचेच 'जिओ टॅगिंग'


मुंबई (सरकार): राज्यभरात असलेल्या १ लाख ८ हजार ३०१ शाळांपैकी केवळ ७७ हजार २९० शाळांचे आतापर्यंत 'जिओ टॅगिंग' करण्यात आले असून ३१ हजार ११ शाळांनी अद्याप नोंदणी केलेली नाही. पुणे जिल्ह्यातील ५५२६ शाळांची सर्वाधिक नोंद झाली आहे. या पाठोपाठ नाशिक ३ हजार ८३९ , सोलापूर ३ हजार ९८८ आणि ठाणे जिल्ह्यातून ३ हजार ५८६ शाळांनी नोंदणी केली आहे.




प्राथमिक शिक्षणाची संस्कार केंद्र असणार्या अंगणवाड्या, शाळा यांच्या कामकाजात एकसूत्रीपणा आणण्यासाठी राज्यातील सर्व शाळा, अंगणवाडी केंद्रांचे छायाचित्रांसह 'जिओ टॅगिंग' करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार आता महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर या संस्थेने शालेय शिक्षण विभागातील सर्व प्रकारच्या शाळांचे भौतिक ठिकाण छायाचित्रांसह टॅग करून भौगोलिक तंत्रज्ञानाद्वारे सर्व माहिती एकत्रित करण्यासाठी महास्कूल जीआयएस मोबाईल ॲप विकसित केले आहे. यामाध्यमातून सध्या नोंदणी सुरु आहे.

पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ७ हजार ३६६ शाळा आहेत. त्यापैकी ५५२६ शाळांचे मॅपिंग झाले आहे. त्याखालोखाल नाशिक जिल्ह्यात १ हजार ७४७, नागपूरमध्ये १३५५, कोल्हापुरात १ हजार ३३८ व नंदुरबारमध्ये १२४७ शाळा मॅप न झालेल्या आहेत. तर सिंधुदुर्ग (२११), भंडारा (२८०), वाशिम (४६०) व हिंगोली (४०६) या जिल्ह्यांमध्ये नोंद न झालेल्या शाळांची संख्या तुलनेने कमी आहे. ठाणे, सोलापूर, सातारा, संगली आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्येही शाळांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, त्यातील अनेक शाळांचे मॅपिंग झालेले आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा-आ.विजयसिंह पंडित



गेवराई (सरकार): प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सद्या सर्व्हे सुरु असून गेवराई विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी सद्या सुरू असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

प्रसिद्धी पत्रकात पुढे ते म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी गेवराई विधानसभा मतदारसंघात सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. एक ते दहा निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी. नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर गेवराई विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. सेल्फ सर्व्हे करण्यासाठी aawas plus २०२४ हे शासनाचे अधिकृत अँप प्ले स्टोअर्सवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टोल करावे. नंतर रस्वहरी ऋलश ीव अँप देखील इंस्टॉल करून घ्यावे. त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून अँपवर विचारलेली माहिती भरून शेवटी आपल्या कच्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा. आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

## संपादकीय

# मानसिकता समजून घ्यावी लागेल!

काश्मीरमधील पहलगाम येथील क्रूर आणि भ्याड हत्याकांडाने सगळा देश हादरून गेला आहे. ज्यांच्या कुटुंबातले लोक या हल्ल्यात मारले गेले त्यांच्या कुटुंबीयांचा आक्रोश कानात सर्वांच्या घुमतो आहे. क्रूरकर्म्यांचे ते क्रूर कृत्य लोकांच्या डोळ्यांसमोरून अजूनही जात नाही अशी स्थिती आहे.

गेला संपूर्ण आठवडा मूर्शताबाद आणि बंगालमधील मुस्लीम बहुल ठिकाणी तसेच अन्य सर्वत्र वक्फ बोर्डाच्या नवीन कायद्यासंदर्भात झालेली निदर्शने आणि त्या निमित्ताने झालेली आंदोलने, हिंदूंवर झालेले अत्याचार याने हिंदू जनमानस ढवळून निघाला होता. आणि आता ही घटना घडली आहे. समाज क्षुब्ध होत आहे. सरकारकडे कडक कारवाईच्या मागण्या होत आहेत. मोर्चे निघत आहेत. पाकिस्तान विरुद्धच्या घोषणा होत आहेत. नेहमीप्रमाणे राजकारणी गिधाडे या सगळ्या प्रसंगात ही आपली गिधाडी वृत्ती न सोडता सरकारवर आरोप करीत आहेत.

रॉबर्ट वडेरा हिंदुत्वाला दोष देत आहे. उबाठा गटाचे प्रवक्ते आणि तमाम उबाठा गँग भाजपाने धर्मावर आधारित भांडणे लावल्यामुळे ही घटना घडल्याचा आरोप करून आपला नालायकपणा सिद्ध करत आहे. फारुख अब्दुल्ला पाकिस्तानी लोकांनी बांगड्या भरलेल्या नाहीत अशी दर्पोक्ती करण्याची हिंमत करतो आहे आणि भारतातील या सगळ्या घडामोडींकडे बघून पाकिस्तानी राक्षस मनोमन हसतो आहे. मोहम्मद बिन कासीम, गझनी मोहम्मद, मोहम्मद घोरी, तुघलक, खिलजी, बाबर, औरंगजेब, अफझल खान या आक्रमकांच्या अत्याचारांच्या कहाण्या पुन्हा जागृत होणारे हत्याकांड काल घडले. दहशतवादीवृत्तीला धर्म नसतो हे लिब्रांडू, डावे, तथाकथित सेक्युलरिस्ट यांच्या आवडत्या वाक्याला छाती ठोकून या दहशतवाद्यांनी धर्म विचारत, कलमा वाचायला लावून, सुंता झाली नाही याची खात्री करत निष्पाप लोकांना गोळ्या घातल्या आणि सिद्ध केले आमच्या दहशतवादाचा धर्म कोणता आहे ते. हिंदू समाज ही मानसिकता न समजल्यामुळे पारतंत्र्यात गेला. काही काळ गुलाम बनला. खंडित झाला.


स्वतंत्र झाल्यावर आजही ७५ वर्षांनी आतंकी छायेतून स्वतःला बाहेर काढू शकलेला नाही. राजकारण्यांनी ही मानसिकता जाणूनबुजून मतांच्यासाठी दुर्लक्षित केली. प्रशासकीय व्यवस्थेतील इंग्रज छाप बाबूंनी या मानसिकतेला जिवंत ठेवले. मुल्ला, मौलवी यांनी स्वतंत्र भारतात ही मानसिकता आणखी प्रज्वलित केली. परिणाम काश्मीर ते सर्वत्र भारतमाता रक्तबंबाळ होत चालली आहे. ही मानसिकता समजून घेण्यासाठी काफीर, गझवा ए हिंद, दार उल अरब, दार उल इस्लाम, जिहाद या संकल्पना ज्या मदरशांमधून शिकवल्या जातात आणि त्यातून रॅडिकल इस्लामी आतंकवादी जन्म घेतात या संकल्पना हिंदू समाजाला समजणे गरजेचे आहे. राजकारण्यांनी कुठल्याही पक्षाचे असेना आपल्या भावी पिढ्यांच्यासाठी का होईना याचा जमिनीवरील परिणाम मतांच्या लालसेतून बाहेर येत समजून घेतला पाहिजे . भाषिक अस्मिता, प्रांतिक अहंकार, जातीय दुराभिमान ज्यामुळे हा हिंदू समाज एकसंध होत नाही त्या वृथा गोष्टींचे अंकुर, काटे छाटून टाकले पाहिजेत कारण यापेक्षा वर उल्लेख केलेल्या संकल्पना उद्या तुमच्या घराचे दरवाजे तोडून कधी आत घुसतील ते कळणार पण नाही. पश्चाताप त्यावेळी करण्यापेक्षा हिंदूंनो वेळीच सावरा आणि संघटित व्हा.

या रॅडिकल, एकेश्वरवादी विचारांनी संपूर्ण जगाची शांतता बिघडवली आहे. जर्मनी, फ्रान्स, इटली, ब्रिटन, सगळे देश आज होरपळून निघत आहेत. स्वस्त मजूर मिळतात या मोहातून आणि उदार मानसिकता यातून केलेल्या चुकांमुळे त्यांना आज पश्चात्ताप होत आहे. सर्वत्र लोकसंख्येचे असंतुलन घुसखोरी आणि अमर्यादित प्रजनन या दोन मार्गांतून साधले जात आहे. संपूर्ण जग ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहे. ईश्वराने निर्माण केलेल्या मनुष्य या सर्वोच्च सुंदर निर्मितीला नष्ट करत आणि त्यातून निर्माण झालेल्या उज्ज्वल मानवी मूल्यांना पायदळी तुडवत खैबर खिंडीतून आलेल्या या वावटळीला कोणे एके काळी पृथ्वीराज चौहान, राणा सांग, राजा दाहीर, राणा प्रताप, गुरू गोविंद सिंग, राजा रणजीत सिंग, लाचित बड फुकान आणि अर्थात आमच्या छत्रपती शिवाजी महाराजांनी रोखून धरल्यामुळे जगातील मानवता अजूनही टिकून आहे.

छत्रपती शिवरायांनी ही मानसिकता ओळखली होती म्हणून प्रतापराव गुजर यांना त्यांनी दूषणे दिली. त्यांनी ही मानसिकता ओळखली होती म्हणून अफजलखान याचा वध झाला, शाहिस्तेखानाची बोटे गेली. हिंदू साम्राज्याची पुन्हा निर्मिती झाली. आमच्या आजूबाजूला असणाऱ्या आणि काळाच्या ओघात मुस्लीम झालेल्या मंडळींनी मुल्ला मौलवी यांचा पगडा झुगारून दिला नाही. हिंदूंच्या भावभावना समजून घेतल्या नाहीत, तर येणाऱ्या काळात संघर्ष अटळ आहे. ही लढाई एकेश्वर वाद आणि एकम् सत् विप्राः बहुदा वदंती यातील आहे. जर हिंदू समाजाने ही मानसिकता समजून घेतली, तर या लढाईत हिंदू टिकाव धरू शकेल अन्यथा काय होईल हे सांगता येत नाही. कुठल्याही सरकारवर, पक्षावर, संघटनेवर आपले भविष्य सोपवून तात्कालिक मोर्चे काढून, स्मशान वैराग्य आणून हा प्रश्न सुटणार नाही. पाकिस्तान हा एक देश किंवा भूभाग नाही ती वृत्ती आहे. अखंड भारतात ती वृत्ती सर सय्यद अहमदखान याने जिवंत केली. मोहम्मद जीनाने त्यात अजून हवा भरली. परिणाम हिंदूंचा संहार. खिलाफत चळवळ परिणाम हिंदूंचा संहार. बांगला देशात सत्तांतर परिणाम हिंदूंचा संहार.

मंदिरे लक्ष्य करणे, स्त्रियांना बाटवणे आणि हिंदूंना अपमानित करण्याची एकही संधी न सोडणे यातून जे घडत आले त्यातील एक घटना पहलगाममधली आहे. पुढील रमझान येईल तेव्हा काश्मीर आपल्या ताब्यात असेल, असे उद्गार काढणारा अतिरेकी संघटनेचा सरदार आणि पाकिस्तान नेमके का निर्माण झाले हे छातीठोकपणे सांगणारा पाकिस्तानचा आर्मी चीफ सगळ्यांचे लक्ष एकच आहे. हिंदू म्हणणारे सर्व संपवणे. मग त्यात बौद्ध, जैन, शीख, आस्तिक, नास्तिक सर्व आले. कुणीही सुटणार नाही. हे लिहिण्यामागे प्रस्तुत लेखकाचे समाजाला भयभीत करण्याचा उद्देश बिलकुल नाही. भारतातील मुस्लिमांनी इंडोनेशियाचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून कट्टरता वाद नाकारला पाहिजे. यातच त्यांचे भले आहेच पण जागतिक शांततेसाठी ते आवश्यक आहे. हिंदू तत्त्व हे मूर्ती पूजा मानणारच.हिंदू देव देवतांच्या हातात शस्त्र आहेत ते शांती प्रस्थापित करण्यासाठी. उच्च मानवी मूल्ये जिवंत ठेवण्यासाठी. पहलगाम घटना हा दोन्ही बाजूने धोक्याची घंटा आहे. ममता, मुलायम, लालू, राहुल, प्रियांका आणि अलीकडे या कंपूत सामील ठाकरे पिलावळ काळाच्या ओघात अस्तित्वहीन होणार आहेत, पण तोपर्यंत जे नुकसान सहन करावे लागणार आहे ते कालच्या घटनेने अधोरेखित झाले आहे. पहलगाम घटनेतून हिंदू समाज जागृत होऊन त्याला शत्रूबोध कळाला आणि आपली राजकीय शक्ती वाढवण्यासाठी तो अधिक संघटित झाला तरच ज्यांनी आज हे समर्पण केले ते कारणी लागेल, अन्यथा अतिरेकी कारवाईतील आणखी एक घटना म्हणून ही घटना इतिहास जमा होईल. एव्हढाच कालच्या सुन्न, दाहक घटनेचा अन्वयार्थ म्हणावा लागेल.

# पहलगामचा हिशोब भारत चुकता करणार!



काश्मीरमधील पहलगाम येथील बैसरनमध्ये दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर केलेल्या हल्ल्याने भारताच्या सर्वोच्च स्थानी असलेल्या जम्मूपासून ते तळाशी असलेल्या कन्याकुमारीपर्यंत असणाऱ्या प्रत्येक भारतीयांकडून संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याला उत्तर देण्यासाठी भारतीयांच्या हाताच्या मुठी आवळल्या जात आहेत. प्रत्येक भारतीयांच्या मनामध्ये या हल्ल्याप्रती सूडाची भावना जागरुक झाली असून पाकिस्तानी दहशतवादाला ठेचून काढण्याची भाषा उघडपणे बोलली जाऊ लागली आहे. भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेला हल्ला हा धर्म विचारून झाला आहे. दहशतवाद्यांनी पंतप्रधान मोदींचे नाव घेत, त्यांना निरोप द्या, असे सांगत निर्ढावल्याप्रमाणे भारतीय भूमीवर गोळीबार केला आहे. भारताच्या विरोधात भारताच्या भूमीवर येऊन केलेला बेछूट गोळीबार हे भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला दिलेले एक प्रकारचे आव्हान आहे. या पर्यटकांमध्ये मृत्युमुखी पडलेले काही पर्यटक, तर नवीन विवाह झालेले असून भारताच्या स्वर्गभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरमध्ये हनीमूनसाठी गेले होते. आपला मुलगा नवसंसाराची सुरुवात करण्यासाठी काश्मीरला जातो काय आणि दहशतवादी हल्ला करून त्याचे पार्थिव घरी येते काय, जी नववधू घरातून गेली होती, तीच नववधू विधवा बनून घरात परतते काय, हा सर्वच संतापजनक प्रकार आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स हे चारदिवसीय भारत दौऱ्यावर आले होते, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर गेले होते. हे सर्व पूर्वनियोजित होते. अचानक घडलेले नाही. जाणीवपूर्वक घडवून आणले गेले आहे. अर्थात त्यासाठी पूर्वतयारीही जोरदार करण्यात आली होती. हा हल्ला पाकिस्ताननेच घडवून आणला आहे, हे उजेडात आले आहे. सरकारने लवकरात लवकर कारवाई करून या घटनेचा बदला घ्यावा, यासाठी केंद्र सरकारवरही भारतीयांचा दबाव वाढत चालला आहे. भारत सरकारनेदेखील त्यादृष्टीने पाऊले उचलण्यास सुरुवात केली असल्याने पाकिस्तानला नजीकच्या काळात पहलगाम हल्ल्याची जबरी किंमत मोजावी लागणार असल्याचे संकेत विविध घडामोडींतून व बैठकांतून प्राप्त होऊ लागले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तत्काळ पहलगामकडे धाव घेत मृतांच्या व जखमींच्या नातेवाईकांची भेट घेतली. तेथील सुरक्षा यंत्रणांकडून घडल्या प्रकाराची माहिती घेतली.

पंतप्रधान मोदी हे जरी त्यावेळी सौदी अरेबियात असले तरी त्यांनी अमित शहा यांना निर्देश देत तपशीलवार आढावा जाणून घेतला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही लष्कराच्या तीनही दलांची बैठक घेऊन कोणत्याही क्षणी काही घडण्याची शक्यता लक्षात घेऊन तीनही दलांना अलर्ट राहण्याचे निर्देश दिले. पंतप्रधान मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट टाकून भारतात परतले. भारतात परतताना त्यांनी पाकिस्तानी हद्दीचा वापर न करता पाकिस्तानला सूचक इशारा देण्याचे कार्यही कृतीतून केले आहे. पंतप्रधानांनी भारतात येत तातडीची बैठक घेतली. लष्कर आणि संबंधित विभागाच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून पंतप्रधानांना यावेळी पूर्ण ब्रिफिंग करण्यात आले. त्यानंतर, अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. परराष्ट्र खात्याने पत्रकार परिषद घेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयावर माहिती दिली. त्यानुसार, पाकिस्तानविरोधात ५ मोठे निर्णय घेत ५ तगडे धक्के पाकिस्तानला देण्यात आले आहेत. पाकिस्तानच्या दिल्ली दूतावासातील कर्मचाऱ्यांची कपात करण्यास सांगताना पुढील ४८ तासांत पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सिंधू जल करारावर स्थगिती देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला असून वाघा बॉर्डर १ मेपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. पाकिस्तानी नागरिकांना मंजूर केलेला भारतातील व्हिसा रद्द करण्यात येत आहे, तसेच भारतातील पाकिस्तान दुतावासाच्या आनुषंगाने देखील महत्त्वाचा निर्णय या बैठकीत झाला आहे. दरम्यान, पाकिस्तानची व्यापाराच्या दृष्टीने कोंडी करण्याची रणनीती भारताने आखली असून आजच्या बैठकीतील निर्णयाचा दूरगामी परिणाम भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांवर होणार आहे. पाकिस्तानला धडा शिकविण्याची मागणी भारतवासीयांकडून करण्यात येत आहे. घडलेली घटना भारतासाठी क्लेषदायी असून अमेरिकेचे उपाध्यक्ष भारतात असताना हा हल्ला घडवून भारतात आलबेल नसल्याचे पाकिस्तानने दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. दहशतवाद ठेचून काढला जाईल, दहशतवादाला माफी नसल्याचा इशारा भारताने दिला आहे. भारतानेही पाकिस्तानचा हिशोब कायमचाच चुकता करावा, पुन्हा असे करण्याचे धाडस पाकिस्तानचे होता कामा नये, असा सूर भारतीयांकडून उघडपणे आळविला जात आहे. देशाच्या शत्रूंनी केवळ निष्पाप पर्यटकांवर नव्हे, तर भारताच्या आत्म्यावरच हल्ला करण्याचे धाडस केले आहे. दहशतवाद्यांच्या हाती उरलेली थोडी-फार जमीनसुद्धा आता हिरावून घेण्याची वेळ आली आहे.

आज बिहारच्या भूमीवरून मी संपूर्ण जगाला सांगतो की, भारत प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवेल, त्यांना शोधून काढेल आणि शिक्षा देईल. आपण त्यांचा पृथ्वीच्या टोकापर्यंत पाठलाग करू. आपण त्यांचा शेवटपर्यंत पाठलाग करू. दहशतवादामुळे भारतीयत्वाचे स्पिरीट कधीही कमी होणार नाही. दहशतवादाला माफ केले जाणार नाही. पहलगाम येथे पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांची ओळख पटवू, त्यांना शोधून काढू आणि त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा त्यांना देऊ, असा वज्रनिर्धार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोलून दाखवला. हल्ला करणारे दहशतवादी आणि याचा कट रचणारे त्यांच्या कल्पनेपलीकडे जाऊन शिक्षा भोगतील. देशाच्या शत्रूंनी भारतीयत्वाच्या स्पिरीटवर हल्ला करण्याचे धाडस केले आहे, असे सांगत भारत लवकरच या घटनेचा हिशोब चुकता करणार असल्याचे संकेत पंतप्रधान मोदी यांनी दिले आहे. २६/११ची घटना असो अथवा पुलवामा हत्याकांड असो, तसेच परवाचा पहलगामचा गोळीबार असो, पाकिस्तान कुरापती काढतच आहे. १९४७ पासून आपण पाकिस्तानाचे उद्योग, कुरापती सहन करत आहोत, पण आता याचा सोक्षमोक्ष लागलाच पाहिजे. पाकिस्तानला धडा शिकविण्याची हीच योग्य वेळ आहे. आता जर कच खाल्ली तर पुन्हा ये रे माझ्या मागल्या प्रमाणे पाकिस्तान नव्याने पुन्हा दहशतवादी कृत्य करेल. पाकिस्तानच्या कृत्याची भारताने आजवर न भरुन येणारी किंमत मोजली आहे, यातना भोगली आहे. पाकिस्तानचे हे कर्ज सव्याज भारताने फेडणे आवश्यक आहे. भारतातील जनता सरकारसोबत आहे. धडा शिकवण्यासाठी भारताची जनता आता टाहो फोडत आहे. सरकारही लवकरच भूमिका घेईल, त्यादृष्टीने वाटचाल सुरू आहे. जैसी करनी, वैसी भरनी काय असते, ते आता पाकिस्तानला समजलेच पाहिजे

## १० सोपे उपाय मधुमेह टाळतील

**१ गाजर पालक–** मधुमेहाच्या रुग्णांनी गाजर-पालकाचा रस मिसळून प्यावा. यामुळे डोळ्यांची कमजोरी दूर होते.

**२ काकडी –** मधुमेहाच्या रुग्णांना भूकेपेक्षा कमी आणि हलके अन्न घेण्याचा सल्ला दिला जातो. अशा परिस्थितीत भूक पुन्हा पुन्हा जाणवते. या स्थितीत काकडी खाऊन भूक भागवावी.

**३ जांभळाच्या बिया –** जांभूळ खाल्ल्यानंतर त्याच्या बिया गोळा करा. वाळवून बारीक पावडर तयार करा. दिवसातून २-३ वेळा ३ ग्रॅम या प्रमाणात पाण्यासोबत सेवन केल्याने लघवीतील साखरेचे प्रमाण कमी होते.

**४ सलगम –** मधुमेही रुग्णाने नियमितपणे सलगम वापरल्याने रक्तातील साखरेचे प्रमाणही कमी होते. म्हणूनच शलजमच्या भाज्या, पराठे, सॅलड्स वगैरे चवी बदलून खाऊ शकतो. यासोबतच करवंद, परवळ, पालक, पपई आदींचा वापर वाढवावा.

**५ लिंबू –** मधुमेही रुग्णांना पाण्याची जास्त तहान लागते. त्यामुळे वारंवार तहान लागल्यावर लिंबू पिळून प्यायल्याने जास्तीची तहान शांत होते.

**६ गव्हांकुराचा रस –** गहू यात गुणकारी गुणधर्म असतात. गव्हांकुराचा रस रसही असाध्य रोग मुळापासून बरा करतो. त्याचा रस मानवी रक्ताशी चाळीस टक्के जुळतो. त्याला हिरवे रक्त या नावाने संबोधले जाते. गव्हांकुराचा रस रस काढून अर्धा कप रुग्णाला लगेच द्यावा. दररोज सकाळी आणि संध्याकाळी अर्धा कप सेवन करा.

## मानसिक आरोग्यासाठी सर्वोत्तम पदार्थ

कामाचा ताण आणि अनेक सामाजिक कारणांमुळे गेल्या काही वर्षांत अनेक प्रकारच्या मानसिक आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. तणाव आणि चिंता यासारख्या मानसिक आरोग्याच्या समस्या खूप हानिकारक असू शकतात. मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे अजिबात दुर्लक्ष करू नये, असे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जीवनशैली आणि खाण्याच्या सवयी योग्य ठेवल्यास मानसिक समस्यांचा धोका कमी करता येतो. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, शरीराचे एकूण आरोग्य राखण्यासाठी पौष्टिक आहार फायदेशीर ठरतो. शारिरीक आणि मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी आहार महत्वाची भूमिका बजावतो. जाणून घ्या या गोष्टींचे सेवन मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते, ज्यामुळे नैराश्य आणि चिंता या समस्यांवर मात करता येते.

**संपूर्ण धान्य :** संपूर्ण धान्य मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तसे, संपूर्ण धान्याचे सेवन अनेक प्रकारे फायदेशीर मानले जाते. संपूर्ण धान्यांमध्ये जटिल कार्बोहायड्रेट्स आणि विविध प्रकारचे पोषक असतात. संपूर्ण धान्य मेंदूला ट्रिप्टोफॅन शोषण्यास मदत करतात. उदासीनता आणि चिंता कमी करण्यासाठी संपूर्ण धान्य फायदेशीर असल्याचे मानले जाते.


**पालक :** पालक आणि हिरव्या पालेभाज्या हे आरोग्यासाठी पोषक आहार आहेत. याचे सेवन केल्याने मेंदूला पुरेशा प्रमाणात फॉलिक ॲसिड मिळते, ज्यामुळे नैराश्याचा धोका कमी होतो. ज्या लोकांना मानसिक आरोग्यामुळे झोपेचा त्रास होतो, त्यांनी पालकाचे सेवन करावे. अभ्यासानुसार, पालकामध्ये असलेले संयुगे वृद्ध



लोकांमध्ये डिमेंशियाचा धोका कमी करण्यास मदत करू शकतात.

**सुका मेवा :** मानसिक आरोग्यासाठी सुक्या मेव्याचे सेवन करावे. सुका मेवा ओमेगा-३ फॅटी ॲसिडचा उत्कृष्ट स्रोत मानला जातो. हे नैराश्याशी लढण्यास मदत करते. उदाहरणार्थ, काजूमध्ये मॅग्नेशियमची चांगली मात्रा मेंदूला ऑक्सिजन प्रदान करते. बदामामध्ये आढळणारे फेनिलॅलानिन नावाचे संयुग मेंदूसाठी डोपामाइन आणि इतर न्यूरोट्रांसमीटर तयार करण्यास मदत करते. या व्यतिरिक्त मानसिक आरोग्यासाठी काही सर्वोत्तम पदार्थांमध्ये हे समाविष्ट आहे: सॅल्मन फिश, चिकन, एवोकॅडो, दही, ऑलिव्ह तेल, टोमॅटो, डार्क चॉकलेट, मानसिक आरोग्यास हानी पोहोचवणारे पदार्थ खाली दिले आहेत. हे पदार्थ टाळावेत: पॅक्ड फळांचा रस, सोडा, एनर्जी ड्रिंक्स, दारू, सोया सॉस, प्रक्रिया केलेले अन्न, डोनट्स आणि इतर.

## फॅशन 'अनारकली'ची



फॅशनच्या बाबतीत बोलू तेवढे कमीच आहे. दररोज बाजारत एक नवी फॅशन दिसते. त्यातही कपड्यांच्या तर्हा तर पाहायलाच नकोत. सध्या लग्नसराईचा मौसम सुरू आहे. त्यामुळे आलेल्या पाहुण्यांपैकी नव्वद जणींचा अनारकली सुट असतोच असतो. कॉटन अनारकली, वर्कड अनारकली, शरारा अनारकली, पेटलेट्स अनारकली, डबल घेर अनारकली असे विविध प्रकार यात पाहायला मिळतात. त्यातच आता भर पडली आहे ट्रान्सपरंट अनारकलीची.

या ड्रेसचा वरचा अर्धा भाग कॉटन, शिफॉन, वेलवेट अशा मटेरियलच्या असून त्यावर पूर्णतः वर्क केलेले असते, तर ड्रेसचा खालचा घेर संपूर्ण ट्रान्सपरंट असतो. या स्टायलची खासियत म्हणजे त्याची सलवार प्लेन नसून चुडीदार स्टायलची मस्त भरीव वर्क केलेली असते. पायावरची ही डिझायनर चुडी उठून दिसावी म्हणूनच अनारकलीचा घेर ट्रान्सपरंट ठेवला जातो. या पॅटर्नमध्ये क्रेप, सिल्क, वेलवेट, क्रश अशा मटेरिअल्सला जास्त मागणी आहे ही फॅशन नवखी असली, तरी त्याला भरपूर पसंती आहे.

अनारकली ड्रेसइतकाच महत्त्वाचा असतो त्याचा चुडीदार, पण अनारकलीवर खूपच वर्क असल्याने पायावरची चुडी झाकली जाते. त्यावरची डिझायनर चुडी दिसण्यासाठी अनारकलीच्या टॉपमध्ये असा बदल करण्यात आला आहे.

# बेलपत्र सकाळी रिकाम्या पोटी खाण्याचे फायदे

बेलपत्राला हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते. हे भगवान शंकराला अर्पण केले जाते. असे मानले जाते की ते महादेवाला अर्पण केल्याने भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात. पण तुम्हाला माहिती आहे का, बेलपत्र हे आरोग्यासाठीही खूप फायदेशीर मानले जाते. त्यामुळे अनेक आजार बरे होण्यास मदत होते. जर तुम्ही रोज रिकाम्या पोटी बेलपत्र खाल्ले तर तुम्ही अनेक गंभीर आजारांपासून दूर राहू शकता. चला तर मग जाणून घेऊया बेलपत्राचे खास फायदे-

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर :** बेलपत्र हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. जर तुम्ही रोज सकाळी रिकाम्या पोटी बेलपत्राचे सेवन केले तर ते हृदयाचे आरोग्य सुधारते. यामध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म आढळतात, ज्यामुळे हृदयाशी संबंधित आजार कमी होतात. याशिवाय उच्च रक्तदाबाचा धोकाही कमी होतो.

**रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास**




**उपयुक्त :** मधुमेहाच्या रुग्णांसाठीही बेलपत्र हे वरदानापेक्षा कमी नाही. रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी तुम्ही रोज सकाळी रिकाम्या पोटी बेलपत्र खाऊ शकता. यामध्ये असलेले फायबर आणि इतर पोषक घटक मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर आहेत.

**पोटाच्या समस्यांपासून आराम मिळतो :** बेलपत्रामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. जे पचनसंस्था निरोगी ठेवते. जर तुम्हाला पोटाशी संबंधित काही समस्या असतील तर तुम्ही ते नियमितपणे रिकाम्या पोटी खाऊ शकता. ज्यामुळे गॅस, ॲसिडिटी, अपचन आणि बद्धकोष्ठता या समस्यांपासून सुटका मिळते.

मूळव्याध रुग्णांसाठी फायदेशीर : ज्यांना मूळव्याधची समस्या आहे त्यांनी रिकाम्या पोटी बेलपत्र खाणे फायदेशीर ठरू शकते. बेलपत्र पाचन तंत्र मजबूत करते. त्यामुळे पोटाशी संबंधित समस्या कमी होण्यास मदत होते. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते : तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत राहिली तर तुम्ही अनेक आजारांपासून दूर राहू शकता. कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे तुम्ही पुन्हा पुन्हा आजारी पडतात. बेलपत्र तुमची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करू शकते. ज्यामुळे तुम्ही सर्दी-खोकला आणि इतर आजारांपासून दूर राहू शकता.

अस्वीकरण: औषध, आरोग्य टिप्स, योग, धर्म, ज्योतिष इत्यादी विषयांवर वेब जगतात प्रकाशित/प्रसारण केलेले व्हिडिओ, लेख आणि बातम्या फक्त तुमच्या माहितीसाठी आहेत. यासंबंधीचा कोणताही प्रयोग करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# विशेष वृत्त

## कुसळंबमध्ये भीम जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**पाटोदा :** तालुक्यातील कुसळंब येथे २६ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात होणाऱ्या या उपक्रमासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रा. सचिन पवार यांनी केले आहे. या कार्यक्रमात रक्तदानासोबत आरोग्य शिबिर, पुस्तक वाटप व मिरवणुकीचा समावेश असून, सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. रक्तदान करून महामानवाला अभिवादन करूया, असेही पवार यांनी सांगितले.

## न.प. कार्यालय क्षेत्रांसाठी आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप

**बीड :** मान्सून काळात नैसर्गिक आपत्तींचा धोका लक्षात घेता, बीड जिल्ह्यातील तहसीलदार व नगरपरिषद क्षेत्रांना आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप करण्यात आले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वतीने ही किट पुरवण्यात आली आहेत. जिल्ह्यातील ६३ पुरप्रवण गावांसाठी या किटमध्ये प्राथमिक उपचार पेटी, लाईफ बॉय, लाईफ जॅकेट, एलईडी टॉर्च, चैन सॉ, रिपेलिंग दोरी, स्ट्रेचर, सेफ्टी बूट, वॉकी-टॉकी व रेनकोट यांचा समावेश असून सर्व साहित्य आयएसआय मानांकित आहे. या उपक्रमामुळे आपत्तीच्या वेळी मदतकार्य अधिक सक्षमपणे करता येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## नाथापूर येथे घरफोडी

**बीड :** तालुक्यातील नाथापूर येथे चोरट्यांनी एका घराचे कुलूप तोडून कपाटातील सोन्याचे दागिणे व नगदी रक्कम असा एकूण दोन लाख ३८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना २२ ते २३ एप्रिलच्या मध्यरात्री ते पहाटेच्या सुमारास घडली. नाथापूर येथे संतोष रामप्रसाद गिराम यांचे घर आहे. चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास या घराचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेशकेला. नंतर उघडून त्यामध्ये ठेवलेले सोन्याचे दागिणे व नगदी रक्कम असा एकुण दोन लाख ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरुन नेला. या घटनेची महिती मिळाल्यानंतर पिंपळनेर पोलिसांनी घटनास्थळी येवून पंचनामा केला.

## श्रावणबाळ व संजयगांधी योजनेतील लाभार्थ्यांचे अर्ज मंजुर करा

**माजलगाव :** तालुक्यातील श्रावणबाळ व संजयगांधी योजनेतील गरीब, गरजु लाभार्थ्यांचे अर्ज सात महिणे होउनही मंजुर करण्यात आले नसुन सदरील अर्ज मंजुर करा अन्यथा उपोषण करण्याचा इशारा तहसिलदाराना अपेक्षित समाज संघटनेच्या वतीने दि. २१ सोमवारी दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, श्रावणबाळ व संजय गांधी योजनेचे शेकडो अर्ज तहसिल कार्यालयात सात महिण्यांपासुन धुळखात पडुन असुन प्रलंबीत आहेत. तहसिल प्रशासनाने अद्यापही या लाभार्थ्यांचे अर्ज मंजुरी परिणामी लाभार्थ्यांना मंजुरीची प्रतिक्षा करावी लागत आहे. त्यामुळे तहसिल प्रशासनाने विनाविलंब प्रलंबीत अर्ज मंजुर करून मंजुरी पत्र तहसिल कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा उपेक्षित समाज संघटनेचे कार्याध्यक्ष अशोक दादाराव नाडे यांनी निवेदनाव्दारे दिला आहे.

## गुरुकुल प्रज्ञाशोध परिक्षेत घुमरे पब्लिक स्कूलचे यश

**गेवराई :** येथील द.बा. घुमरे पब्लिक स्कूल (माध्यमिक) ने गुरुकुल प्रज्ञाशोध मंडळ कोल्हापूरद्वारे आयोजित केलेल्या गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ मध्ये यश संपादन केले. दि.३ मार्च रोजी झालेल्या परीक्षेमध्ये शाळेतील एकूण ११ विद्यार्थी बसले होते. पैकी सर्वच विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.

वैष्णवी एकनाथ राठोड ही विद्यार्थिनी तालुक्यामध्ये प्रथम जिल्ह्यामध्ये २८ वा नंबर व राज्यामध्ये ६२ वा क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाली. तसेच संस्कार गणेश गवारे हा तालुक्यातून दुसरा, जिल्ह्यातून ३० वा व राज्यातून ६५ वा क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाला. त्यांना या परीक्षेसाठी ए.एम.काळे, पी.जी.कावळे. एम.एस. पवार, आर. एस. सोळंके यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा एम.डी. निंबाळकर, सचिव दीपक घुमरे, मुख्याध्यापक सी.एल. थेटे, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक वर्ग यांनी अभिनंदन केले.

## डॉ. सुशील गिते यांचा बीड येथे सत्कार

**बीडः** येथील जिल्हा शासकीय रुग्णालयाचे माजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सूर्यकांत गिते यांचे चिरंजीव डॉ. सुशील गीते यांनी युपीएसीपरीक्षेत ६२३ वी रँक घेऊन घवघवीत यश मिळवले आहे. याबद्दल डॉ. सुशील गिते यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड. राहुल मस्के, अभियंता राहुल सोनवणे, राहुल हजारे, अशोक शेजवळ आदींनी डॉ. सुशील यांचा सत्कार केला. याप्रसंगी सुशीलचे आई, वडील डॉ. सूर्यकांत गीते यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

## कोडींग कोर्स गुणवत्ताधारक डॉ. विठ्ठल जाधव सन्मानित

**शिरूर :** साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांना अमेझॉन फ्यूचर इंजिनिअर या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत आयोजित कोडींग कोर्समध्ये गुणवत्ता धारण केल्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते दि. २४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद सभागृह, बीड येथे लॅपटॉप भेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी भगवान फ लारी, श्रीकिसन देशमुख, प्रा. विक्रम सारूक यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षण व्यवस्थेत नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढायला हवा असे आदित्य जीवने बक्षीस वितरण प्रसंगी बोलताना म्हणाले. डॉ. विठ्ठल जाधव हे तीस वर्षांहून अधिक काळ जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. बालसाहित्य विषयात पीएचडी पदवी प्राप्त असून त्यांच्या 'पांढरा कावळा' या बालकादंबरीस महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी राज्यस्तरीय उत्कृष्ट वाययनिर्मिती पुरस्कार (२०१२) लाभला आहे. बटाटीची धार (बाल कथासंग्रह), तिवढा, रानरांगूळ हे कथासंग्रह, गर्भकळा कवितासंग्रह, उंदरीन सुंदरीन आणि अटर का पटर हे दोन बालकविता संग्रह प्रकाशित आहेत. दरम्यान तालुक्यातील प्रदीप दुधाळ यांना लॅपटॉप आणि गणेश शिंदे, किशोर सुपेकर, रामदास पाखरे, श्रीमंत तळेकर, अशोक सप्रे, स्वाती राऊत, संगीता वारे, संध्या कुलकर्णी या शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यशस्वीतांचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे, जमीर शेख यांनी स्वागत केले आहे.

# जिल्हयाचे प्रशासन गतिमान करण्यासाठी प्रयत्न करणार: जिल्हाधिकारी

## विवेक जॉन्सन यांनी स्विकारला पदभार

**बीड (प्रतिनिधी):-** चंद्रपुर येथील माझ्या कामांचा अनुभव आणि आपल्या सर्वांचे सहकार्य याचा वापर करून जिल्हयातील प्रशासन गतिमान करण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही नुतन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, शासनाच्या वतीने शंभर दिवस कार्यक्रम हा उपक्रम राबविला जात आहे. या माध्यमातून जिल्हयातील जनतेला जास्तीत जास्त कशा प्रकारे लाभ देता येईल यासाठी माझे प्रयत्न राहणार आहेत. जिल्ह्यातील एकुण

परिस्थितीत मी अभ्यास करीत असून येणाऱ्या काळात सर्वांना सोबत घेवून जिल्हयात काम करणार आहे. प्रशिक्षणाच्या काळात माजलगाव येथील नगर परिषदेमध्ये काम केल्याचा अनुभव माझ्या पाठीशी असल्याने या जिल्ह्यातील समस्यांची मला जाण आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने जिल्ह्याच्या विकासाला गति प्राप्त झाली आहे. त्यांच्या नियोजनाखाली अधिक अधिक योजना जिल्हयासाठी राबवून येथील नागरिकांना त्याचा कसा फायदा होईल यासाठी माझे प्रयत्न असणार असल्याचेही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगीतले.

जिल्हयाचे जिल्हाधिकारी म्हणून विवेक जॉन्सन यांनी गुरुवारी (दि.२४) पदभार स्विकारला. जॉन्सन २०१८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. येथे बदलून येण्यापूर्वी ते चंद्रपूर येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. अभियंता पदवी नंतर ते प्रशासकीय सेवेत आहेत. यापूर्वी त्यांनी परिविक्षाधिन कालावधीत येथील माजलगाव नगर परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर काम केलेले आहे. त्यांनी पदभार स्विकारल्यावर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी त्यांचे प्रशासनातर्फे स्वागत केले. यावेळी महसूल विभागाचे अधिकारी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच इतरांची उपस्थिती होती. विवेक जॉन्सन यांनी पलक्कड येथील एनएसएस महाविद्यालयातून यांत्रिकी अभियंता परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर ते २०१६ साली भारतीय महसूल सेवा (आयआरएस) व नंतर २०१८ साली भारतीय



प्रशासन सेवेत रुजू झाले. स्मार्ट आरोग्य केंद्र उभारणीत एकूण ३२ आरोग्य केंद्र त्यांनी अद्यावत केले. मिशन 'सक्षम' अंतर्गत खगोल प्रयोगशाळा तसेच ८ विज्ञान उद्यानांची उभारणी, जिवनोन्नती अंतर्गत बचतगटांसाठी १० विशेष मॉलची उभारणी ग्रामसडक अंतर्गत ५ हजार कि.मी. रस्ते बांधणी, ग्रामीण भागात पर्यटन विकास कार्य करताना विवेक जॉन्सन यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेस गती देण्यासाठी १६ कृषी माल गोदामांची उभारणी केली. आता ते बीडला जिल्हाधिकारी म्हणून काम जबाबदारी निभावणार आहेत.

### विविध पुरस्काराने सन्मान

बीडचे जिल्हाधिकारी डॉ. विवेक जॉन्सन यांनी यापूर्वी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा विविध पुरस्काराने सन्मान झालेला आहे.

## विजेच्या लंपडावाने पिंपळनेरकर त्रस्त; आंदोलनाचा इशारा

**बीड (प्रतिनिधी):** तालुक्यातील पिंपळनेर परिसरातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर २४ तास वीज अनिवार्य असली तरीही परिसरातील वीज वारंवार खंडित होत आहे. त्याचा त्रास नागरिकांना होत आहे. येथील वीजपुरवठा सुरळीत करा अन्यथा लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा पिंपळनेर विकास कृती समितीने दिला आहे.

गेल्या आठवड्यांपासून, पिंपळनेर, काही ईंट, जवळा, नाथापूर, गुंदावडगांव, ढोरवाडी, सांडरवन आदी परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. सध्या

परिसरातील कमाल तापमान ४१ अंशांपर्यंत असल्याने एसी, फॅन, कुलरचा वापर करणे अनिवार्य झाले आहे. परंतु, सतत होर्णाया खंडित वीजपुरवठ्यामुळे नागरिक विशेषतः लहान बालके, वयोवृद्ध व विद्यार्थी हैराण झाले विजेच्या कमी जास्त आहेत. दाबामुळे टीव्ही, फिज, एसी, कुलर, मिक्सर, गिझर यांसारख्या वस्तू खराब होण्याचे प्रकार घडत आहेत. वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास पिंपळनेर येथील महावितरण कंपनीच्या कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचा इशारा पिंपळनेर विकासकृती समितीचे प्रमुख शिरसाट शिवप्रसाद यांनी दिला आहे.

# केजमध्ये कला केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय; चौघांविरुध्द गुन्हा

## पोलिसांच्या कारवाईत दहा पीडित महिलांची सुटका

**केज (प्रतिनिधी):** येथे कला केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्यावरून गुरुवारी (दि.२४) पहाटे ३.३० वाजता जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशाने पोलिसांनी छापा टाकण्यात आला. या कारवाईत कला केंद्राच्या मॅनेजरला ताब्यात घेत मालकी, चालक आणि मॅनेजर अशा चौघांवर गुन्हा दाखल केला असून दहा पीडित महिलांची सुटका केली आहे. तालुक्यातील उमरी शिवारात असलेल्या महालक्ष्मी कला केंद्रात कला केंद्राच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना मिळाली. त्यांनी नियंत्रण कक्षाचे सपोनि. मधुसूदन घुगे आणि अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कक्षाच्या सपोनि. वर्षा व्हगाडे यांना कारवाईचे आदेश दिले. त्यांनी पथकातील कर्मचारी बहीरवाळ, शिंदे, अविनाश घुंगर्ड, शुभम घुले, अर्चना वंजारे, भाग्यश्री खांडेकर यांच्या पथकाने डमी ग्राहक पाठवून दोन



पंचांसह कला केंद्रात सापळा रचला. त्यावेळी कला केंद्राचा मॅनेजर मयूर अंधारे याला पोलिसांनी ताब्यात घेत दहा पीडित महिलांची सुटका केली आहे. स.पो.नि.मधुसुदन घुगे यांच्या तक्रारीवरून या कला केंद्राचे मालक, सत्वशीला बाबासाहेब अंधारे, आदित्य सत्वशीला अंधारे आणि. मॅनेजर मयूर बाबुराव अंधारे या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पो.नि. वैभव पाटील हे तपास करीत आहेत.

## कोडींग कोर्स गुणवत्ताधारक डॉ. विठ्ठल जाधव सन्मानित

**शिरूर (प्रतिनिधी):-.** साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांना अमेझॉन फ्यूचर इंजिनिअर या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत आयोजित कोडींग कोर्समध्ये गुणवत्ता धारण केल्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते दि. २४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद सभागृह, बीड येथे लॅपटॉप भेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी शिक्षणाधिकारी भगवान फ लारी, श्रीकिसन देशमुख, प्रा. विक्रम सारूक यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षण व्यवस्थेत नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढायला हवा असे आदित्य जीवने बक्षीस वितरण प्रसंगी बोलताना म्हणाले. डॉ. विठ्ठल जाधव हे तीस वर्षांहून अधिक काळ जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. बालसाहित्य विषयात पीएचडी पदवी प्राप्त असून त्यांच्या 'पांढरा कावळा' या बालकादंबरीस महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी



राज्यस्तरीय उत्कृष्ट वाययनिर्मिती पुरस्कार (२०१२) लाभला आहे. बटाटीची धार (बाल कथासंग्रह), तिवढा, रानरांगूळ हे कथासंग्रह, गर्भकळा कवितासंग्रह, उंदरीन सुंदरीन आणि अटर का पटर हे दोन बालकविता संग्रह प्रकाशित आहेत. दरम्यान तालुक्यातील प्रदीप दुधाळ यांना लॅपटॉप आणि गणेश शिंदे, किशोर सुपेकर, रामदास पाखरे, श्रीमंत तळेकर, अशोक सप्रे, स्वाती राऊत, संगीता वारे, संध्या कुलकर्णी या शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यशस्वीतांचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे, जमीर शेख यांनी स्वागत केले आहे.

## राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत रौप्यपदक

**माजलगाव (प्रतिनिधी):-** छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय खुल्या कराटे स्पर्धेत माजलगाव येथील हितांशी रितेश मुगदिया (वय ६ वर्ष) हिने सुवर्ण पदक तर रिदम रितेश मुगदिया (वय १० वर्ष) हिने रौप्य पदक पटकाविले.

ही स्पर्धा दि.१८एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर येथे केली होती. या दोघींबरोबर याच अकॅडमीच्या १२ खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण १२ पदकांची लयलूट केली. अकॅडमीचे सुवर्ण पदक विजेते खेळाडू हितांशी मुगदिया, अन्वी सारडा, रेणू पंडित, संध्या कुटे, जान्हवी होके, आदर्श पवार, हर्षवर्धन जाधवर तर अकॅडमीचे रौप्य पदक विजेते खेळाडू रिदम मुगदिया, आरव सारडा, श्रीपदम भावसार, प्रज्वल उजगरे, नंदनी राठोड हे आहेत.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार, आरोपीस आजन्म कारावास

## केज येथील सत्र न्यायाधीश कुणाल जाधव यांचा महत्वपूर्ण निकाल

**केज (प्रतिनिधी):** अंगणात सायकल खेळत असलेल्या अल्पवयीन मुलीस मोबाईलचे अमिष दाखवून घरामागे शेतात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी आरोपीस सत्र न्यायाधीश कुणाल जाधव यांनी आजन्म कारावास आणि ५० हजार रु. चा दंड ठोठवला आहे.

या बाबत घटनेची माहिती अशी की, दि. २२ मार्च २०२३ रोजी दुपारी ३ च्या सुमारास केज तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलगी ही अंगणात सायकल खेळत असताना नागनाथ शहाजी शिंदे याने तिला मोबाईल दाखवतो असे म्हणून आमिष दाखवून घराच्या मागे असलेल्या शेतात नेवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आणि जिवे मारण्याची धमकी दिली. पीडित मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात आरोपी नागनाथ शहाजी शिंदे याच्या विरूध्द भा. दं. वि. कलम ३७६ (१), ३७६ (एबी) यासह बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ चे कलम ४(२), ६, १०, १२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्या फिर्यादीवरुन तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक एस. के. कोळी यांनी या प्रकरणाचा तपास करून सत्र न्यायालय केज येथे दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणाची सुनावनी सत्र न्यायाधीश वर्ग-१ कुणाल जाधव यांच्या न्यायालयात झाली. आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. या प्रकरणात पिडीता, तिची आई, वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष तसेच सरकार पक्षाचे दाखल केलेले सक्षम पुराव्याचे व कागदोपत्रांचे अवलोकन करुन व सहायक सरकारी वकील ॲड. राम बिरंगळ यांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन सत्र न्यायाधीश कुणाल डी. जाधव यांनी आरोपी नागनाथ शहाजी शिंदे याला बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे कलम ४ व ६ प्रमाणे आजन्म कारावास व एकुण ५० हजार रु दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहाय्यक सरकारी वकिल ॲड. राम बी. बिरंगळ यांनी काम पाहिले व त्यांना सहायतक सरकारी वकील ॲड. आर.पी. उदार यांनी सहकार्य केले. तसेच त्यांना पैरवी महिला अधिकारी तथा पोलीस हेडकॉन्स्टेबल बनसोडे यांनी सहकार्य केले.

बीड सरकार



# मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीत १५ कोटींचा अपहार

## फेर लेखापरीक्षण अहवाल; २४ जणांवर गुन्हा दाखल;एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२३ चे फेर लेखापरीक्षण

माजलगाव (सरकार) माजलगाव संस्थेत जमा झालेल्या ठेवीच्या नोंदी व कर्ज रकमेच्या नोंदी संगणकावर न करता बनावट दस्तऐवज करून ठेवीदारांना ठेव पावत्या व कर्जदारांना बेबाकी प्रमाणपत्र दिले. त्यामुळे मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे संचालक मंडळ व कर्मचारी, मालमत्ता खरेदीदार व या बँकेच्या लेखापरीक्षकांसह २४ जणांवर माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजलगाव शहरातील मोंढा भागात असलेल्या मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२३ चे फेर लेखापरीक्षण विशेष लेखा परीक्षक वर्ग २ सहकारी संस्थेचे सतीश काकासाहेब पोकळे यांनी करून याचा अहवाल वरिष्ठांना सादर करण्यात आला. यात समृद्ध मराठवाडा मल्टीस्टेट व्हिकल सर्व्हिसेस को-ऑप सोसायटी या नावाने कॅश क्रेडिट ९ कोटी ३९ लाख ७० हजार ८२१, मुदत ठेव मधील अपहार श्रीराम मच्छिंद्र बहिर ६ लाख, सुहास संपत जाधवर ३० लाख, कर्ज वितरणातील अपहार व गैरव्यवहार ५ कोटी ५० लाख रूपये केला. असा सर्व मिळून १५ कोटी २५ लाग ७० हजार ८२१ रूपयांचा समावेश आहे. त्यामुळे याप्रकरणात माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.




आरोपींमध्ये यांचा समावेश मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष सतीश गंगाधर सावंत, गणेश त्रिंबकराव शेळके, विश्वंभर पांडुरंग शिंदे, शिवाजी लक्ष्मण गडदे, अनिता पृथ्वीराज होके, सुनीता भास्करराव खटले, सुमित बाळकृष्ण भावसार, योगेश एकनाथ घुले, पोपट शिवाजी आवाड (हे सर्व संचालक), मुख्य कार्यकारी अधिकारी किशोरी सतीश सावंत व गजानन विठ्ठलराव डासाळकर, व्यवस्थापक अमोल सुखदेव अंधारे, रविकिरण मधुकर दहिवाळ, भाग्यश्री गगानन डासाळकर, गुलाबाई रूपाजी अंधारे, अंजली अमोल अंधारे, अशोक आता गिरी (हे सर्व संस्थेचे कर्जदार), लेखापरीक्षक एस.बी. गायकवाड व किरण कमलाकर सावजी तसेच धनराज प्रेमराज बंब व विजयराज हेमराज बंब यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. पोलिसांकडून या आरोपींचा शोध घेऊन अपहाराच्या गुन्ह्याचा तपास केला जाणार आहे. त्यासंदर्भात आवश्यक असणारी कागदपत्रेही जप्त केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# मोबाईल ॲपद्वारे १०० टक्के ई पीक पाहणी पूर्ण करण्याच्या सूचना

बीड (सरकार):राज्यात उन्हाळी हंगाम २०२५ पासून ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲप द्वारे पीक नोंदणी करण्यात येणार आहे.

दिनांक १ एप्रिल २०२५ पासून राज्यातील सर्व गावांमध्ये उन्हाळी हंगाम २०२५ सुरू करण्यात येत आहे या प्रकल्पात शेतकरी स्तरावरून व सहाय्यक स्तरावरून मोबाईल प द्वारे पिकाची नोंदणी करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे शेतकरी स्तरावरील ई पिक पाहणी उन्हाळी हंगाम कालावधी १ एप्रिल २०२५ ते १५ मे २०२५. सहाय्यक स्तरावरील ई पिक पाहणी उन्हाळी हंगाम कालावधी १६ मे २०२५ ते २९ जुन २०२५ उन्हाळी हंगाम २०२५ ची १०० टक्के ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल प द्वारे पूर्ण करावयाची आहे. दिनांक २२. ४. २०२५ च्या दैनिक अहवालाच्या अवलोकन केले असता ०.०८ टक्के क्षेत्राची पीक नोंदणी झाल्याचे दिसून येते.



त्या अनुषंगाने दिलेल्या सूचनाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करून उन्हाळी हंगाम २०२५ ची शेतकरी व सहाय्यक स्तरावरील ई पिक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲप द्वारे विहित कालावधी १०० टक्के पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत.

# विवेक जॉन्सन यांनी स्विकारला बीड जिल्हाधिकारी पदाचा पदभार

बीड (सरकार): जिल्हयाचे जिल्हाधिकारी म्हणून विवेक जान्सन यांनी आज पदभार स्विकारला. श्री. जॉन्सन २०१८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. येथे बदलून येण्यापूर्वी ते चंद्रपूर येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते.



अभियंता पदवी नंतर ते प्रशासकीय सेवेत आहेत. त्यांनी परिविक्षाधिन कालावधीत येथील माजलगाव नगर परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर काम केलेले आहे. त्यांनी पदभार स्विकारल्यावर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी त्यांचे प्रशासनातर्फे स्वागत केले. यावेळी महसूल विभागाचे अधिकारी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच इतरांची उपस्थिती होती.

पलक्कड येथील एनएसएस महाविद्यालयातून यांत्रिकी अभियंता परिक्षा उत्तीर्ण २०१६ साली भारतीय महसूल सेवा (आयआरएस) व नंतर २०१८ साली भारतीय प्रशासन सेवेत रुजू स्मार्ट आरोग्य केंद्र उभारणीत एकूण ३२ आरोग्य केंद्र अद्यावत केले. मिशन 'सक्षम'अंतर्गत खगोल प्रयोगशाळा तसेच ८ विज्ञान उद्यानांची उभारणी जिवनोन्नती अंतर्गत बचतगटांसाठी १० विशेष मॉलची उभारणी ग्रामसडक अंतर्गत ५००० किमी रस्ते बांधणी ग्रामीण भागात पर्यटन विकास कार्य तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेस गती देण्यासाठी १६ कृषी माल गोदामांची उभारणी. उल्लेखनीय कार्याबद्दल शासनाच्या बालस्नेही पुरस्काराचे मानकरी लोकाभिमूख कार्याबद्दल 'महाराट्रीयन ऑफ द इअर २०२३' पुरस्काराने गौरव ग्रामीण जीवनात,अर्थव्यवस्था आणि मुलभूत सुविधा उभारणीसाठी 'स्कॉच पुरस्कार'

## हमाली करणाऱ्या दलित तरुणाला जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण

बीड (सरकार): शहरातील खासबाग परिसरात दत्ता अडागळे या दलित तरुणाला तेथील कैसर आणि जिहाद या दोन भावांनी तसेच अन्य अज्ञात दोघांनी मिळून दगड डोक्यात मारुन जातीवाचक शिवीगाळ करुन लाथा बुक्क्याने मारहाण केली याबाबतची तक्रार शहर पोलीस स्टेशनला नोंदवून घेण्यासाठी पोलीसांनी पुर्ण दिवस वेळ लावत मध्यरात्री मारहाणीचा गुन्हा नोंद केला आहे यामुळे पोलीस प्रशासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करत दत्ता अडागळे यांना मारहाण करणार्यावर अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा नोंद करण्याची मागणी मनसेचे सोमेश्वर कदम यांनी पोलीस स्टेशन येथे जावून केली आहे.

दत्ता लक्ष्मण अडागळे हे हमालीचे काम खासबाग येथील आडत दुकानी करतात त्यांनी दि.२० एप्रिल रविवार रोजी पहाटे ४ सुमारास भाजीपाल्याचा अॅटोरिक्षा आडत मार्केट येथे घेवून गेला यावेळी दत्ता अडागळे याला इसाक शेट यांच्या दुकानी माल टाकायचा होता त्यावेळी तेथे असणारा कैसर म्हणाला की इसाकचा माल आहे का त्यावळ दत्ता म्हणाला की हो त्यावर कैसरने इसाक आणि तु दोघेही तिकडे...... अशी शिवी दिली त्यावेळी दत्ता याने कैसर यांना शिवी देवू नका असे म्हणाले असता जातीवर शिवी देत तु काय करशील तुझे हातपाय तोडेल मी असे म्हणून अंगावर धावला त्यावेळी दत्ता याने भांडण मिटवते घेवून माल इसाक यांच्या आडत दुकानी ठेवला आणि बाहेर जावू लागला परंतू कैसर याने दत्ता गेटच्या बाहेर जात असतांना दगड घेवून कपाळवर फेकून मारला व त्यानंतर बाजूला असणारा जिहाद याने दगड घेवून डोक्याच्या मागे मारला त्यानंतर अन्य दोन व्यक्तींनी लाथाबुक्क्याने मारहाण केली त्यानंतर जवळील लोकांनी भांडणे मिटवली व दत्ता अडागळे यांना रुग्णालयात उपचाराकामी शरीक केले हा सर्व प्रकार घडलेला पोलीसांना सांगितल्यानंतर पोलीसांनी मारहाणीचा गुन्हा नोंदविण्यासाठी देखील मध्यरात्रीचे १ वाजवला गंभीर मारहाण केली असतांनाही तसेच जातीवाचक शिवीगाळ केलेली असतांनाही मारहाणीचा गुन्हा नोंदविला असून पोलीस प्रशासनाने अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा नोंद करण्याची मागणी मनसेच्या सोमेश्वर कदम यांनी केली आहे.

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत बीड जिल्हा चमकला!

## ना.पंकजाताई मुंडे यांनी केले भूमीपुत्रांचे मनस्वी अभिनंदन

बीड (सरकार): केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत बीड जिल्ह्याच्या भूमिपुत्रांनी चमकदार कामगिरी केली असून यशस्वी विद्यार्थ्यांचे राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन केले आहे.



केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला, यात जिल्ह्यातील भूमिपुत्रांनी दैदीप्यमान असे यश मिळवले, याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी आनंद व्यक्त केला आहे. परळी तालुक्यातील पांगरी ( गोपीनाथगड ) येथील अक्षय संभाजी मुंडे व पाटोदा तालुक्यातील डॉ. पंकज आवटे व बीड येथील डॉ सुशील गिते यांनी दैदिप्यमान यश संपादित करत घवघवीत यश मिळवले आहे.राष्ट्रीय स्तरावर आपल्या जिल्ह्याची मान उंचावणारे तुमचे हे यश आम्हा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. पुढील काळात देशातील सर्वसामान्य नागरीकांची सेवा तुमच्या हातून घडणार आहे. सामान्यांच्या समस्या आणि सेवेला प्राथमिकता देऊन आपण राष्ट्रनिर्मितीत भरीव योगदान द्याल हा विश्वास आहे. तुम्हा दोघांचेही पुनःश्च अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा! अशा शब्दांत ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन केले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उपेक्षितांच्या प्रगतीसाठी लढा उभा केला-पप्पू कागदे

बीड (सरकार): भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी व उपेक्षितांना त्यांच्या हक्काची व अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी जाती व्यवस्था बदलण्याचे काम करीत भारतीय संविधानाची निर्मिती करून भारतीय लोकशाही मजबूत केली. त्याचबरोबर, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय प्रवाहात आणण्यासाठी व साक्षर समाज घडविण्यासाठी शिक्षणाची दारे खुली केली. आपल्या हक्क व अधिकारांसाठी लढण्यास प्रवृत्त केले. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्यायावर आधारीत असलेली समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करीत समाज बांधवांच्या प्रगतीसाठी देशभर लढा उभा केला. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त तलवाडा, घाटसावळी, पारगांव (सि), नाळवंडी, ताडसोन्ना या गांवी केले.



पुढे बोलतांना पप्पू कागदे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून अठरा पगड जातीच्या समाज बांधवांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधानात अनेक कलमांची नोंद करून त्याचे हक्क व अधिकार मिळवून दिले. थोर महापुरुषांचे विचार आत्मसात करून आगामी काळात युवकांनी व्यसनमुक्त समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी महापुरुषांचे विचार घरा-घरात व गावा-गावात पोहचविण्याचे काम करावे. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडीत, किशोर कांडेकर, किसन तांगडे, शाहु डोळस, सुभाष तांगडे, संजय गव्हाणे, भैय्या भालेराव, आप्पा भालेराव, सुनिल कांडेकर, भाऊसाहेब भालेराव, विजय डोंगरे, अशोक आठवले, विनोद आठवले, आंबादास आठवले, युवराज डोंगरे, गिताराम डोंगरे,माऊली डोंगरे,नामदेव वाघमारे यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

# खळबळजनक...! नगर परिषद बीडची अनोखी अट पाण्याच्या टँकरसाठी लागणार माजी नगरसेवकाचे पत्र

## नगरपरिषदेवर प्रशासक असताना माजी नगरसेवकाची आवश्यकता काय-जिल्हाध्यक्ष अजय सरवदे

बीड (प्रतिनिधी) माजी नगरसेवकांनी पत्र दिले तरच त्या भागातील लोकांना पाणी मिळणार अशी नवीन अट नगर परिषद बीड यांनी तयार केली आहे. विस्तृत माहिती अशी की, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी बीड शहराला आठ दिवसाला पाणीपुरवठा व्हावा यासाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना नगरपरिषद बीड यांना देण्यात आल्या होत्या त्या अनुषंगाने माजलगाव बॅक वॉटरच्या पाणी संदर्भात विशेष स्तरावर काम सुरू आहे हे काम जानेवारीच्या एडिंगलाच होणे महत्त्वाचे होते परंतु ऐन पाण्याची गरज असताना मे महिन्यामध्ये पाईपलाईनचे काम सुरू केल्याने बीड शहरामध्ये गेल्या वीस दिवसापासून पाण्याची तीव्र टंचाई सुरू आहे.

यामध्ये नगरपरिषद बीडवर प्रशासक असून काही स्वार्थी माजी नगरसेवकांनी नगरपालिकेला पत्र देऊन आमचे पत्र आल्याशिवाय पाण्याचे टँकर पाठवू नये अशी अट टाकल्याने पाण्यासाठी माजी नगरसेवकापुढे विनवणी करून टँकर मागवावे लागत आहे. बीड शहरातील काही माजी नगरसेवक हे आपापल्या वार्डातील नागरिकांना पत्राच्या माध्यमातून वेठीस धरण्याचे काम करत असल्याचे दिसून आले आहे.

नगरपरिषद बीड प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी कविता जाधव व मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे दुर्लक्ष होत आहे. त्यांच्या अधिनस्त काम करणारे नगर परिषद बीडमधील अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कसल्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याचे दिसून आले आहे. मनाला येईल तश्या नियम अटी लादून पाण्यासाठी वेठीस धरले जात आहे.

शहरातील नागरिकांना पाण्याच्या टँकरसाठी माजी नगरसेवकाच्या पत्राची अट त्वरित रद्द करावी असे न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात अशा आशयाचे निवेदन मा. जिल्हाधिकारी बीड, नगर परिषद प्रशासक बीड यांना देण्यात आले आहे.

## वरुथिनी एकादशी निमित्त गायत्री महायज्ञ संपन्न

बीड (सरकार): श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीड येथे आज दिनांक २४/४/२०२५ रोजी वरुथिनी एकादशी निमित्त गायत्री महायज्ञ संपन्न झाला.

मंदिराचे अध्यक्ष ड मंगेश पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व गायत्री परिवार बीड कडून आयोजित प्रत्येक एकादशी निमित्त व चतुर्थी निमित्त यज्ञ आयोजित केले जातात या नियमाने आज वरुथिनी एकादशी निमित्त गायत्री यज्ञ संपन्न झाला. यामध्ये आजचे यज्ञाचे यजमान गायत्री परिवाराचे बीडजिल्हा समन्वयक मोहन म.खरमाटे सहपरिवार होते तर यज्ञाचे पौरोहित्य रत्नपारखी महाराज व सौ मीनाक्षी गायकवाड यांनी केले. यज्ञाच्या पूर्ण आहुतीनंतर पहलगाम येथे झालेल्या हिंसाचारात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप बांधवां साठी श्रद्धांजली अर्पण केली, यावेळी श्री मुकुंद भुतपल्ले, विलास लेंभे, मुंडे, दुधाळ,मेहत्रे, जाधव, महावीर बोरा साईनाथ दुधाळ,बडे,पोकळे परिवार, परदेशी, पोकळे काकू, चंपावतीपत्र चे पत्रकार महादेव साळुंके हजर होते.

# बंधाऱ्याचे साहित्य चोरणाऱ्या तिघांना पकडले

आष्टी (सरकार): मंगळवारी रात्रीच्या दरम्यान नदीपात्रातील बंधाऱ्याच्या लोखंडी गेटची चोरी करून, ते एका वाहनात भरून विक्रीसाठी जात असल्याची गोपनीय माहिती समजताच आष्टी पोलिसांनी मोठ्या शिताफीने मुद्देमालासह तिघांना रंगेहाळ पकडले. यात एका अल्पवयीन आरोपीचा समावेश आहे. त्यांच्याकडून लोखंडी गेट चोरीच्या इतर आणखी घटना उघडकीस येण्याची शक्यता आहे.

त्याची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने आष्टी तालुक्यातील आष्टी-सांगवी क्षेत्रातील नागापूर सांगवी बंधाऱ्याचे लोखंडी गेट काढून ते वाहनात (एमएच१६,सीए ०१०८) भरत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांना मिळताच त्यांनी पोलीस हवालदार अशोक शिंदे, पोलीस नाईक विकास जाधव, वाहनचालक उदावंत यांना सूचना केल्या. त्यानुसार मंगळवारी रात्री साडेअकराच्या दरम्यान तिघांना रंगेहाथ पकडून मुद्देमालासह अटक केली.

# भानामती करामतीतुन सोन्याच्या अंगठीसह ३९ हजारांची फसवणुक !

माजलगाव (सरकार): माजलगाव शहरातील नवीनबसस्थानकातील बस स्थानकात बसेस थांवण्याऱ्या गाळ्यांचे समोरील सिंमेटच्या बाकड्यावर बसलेल्या मजुरी करणाऱ्या एका वक्तीवर दोन अज्ञात आरोपींनी संगनमत करुन भानामती करामीतुन त्यांची सोन्याच्या अंगठी सह नगदी रक्कम असे मिळुन ३९हजार, ३५०रु ची फसवणुक केल्याची घटना घडली.

प्रकरणी समजलेल्या पिडीत फिर्यादी सर्जेराव रामभाऊ खंडागळे व्यवसाय मजुरी (५५वर्षे) रा. गोविंदवाडी, ता. माजलगाव यांनी २३एप्रिल बुधवार रोजीच्या रात्री ७:५८वा शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार ते सकाळी १०वा च्या सुमारास कुठल्यातरी गावा कडे जाण्यासाठी नवीन बसस्थानका समोरील नमुद ठिकाणी बसलेले होते. हे त्या दोन आरोपींनी हेरल अन् ते सर्जेराव जवळ जाऊन बसले आणि त्यांना म्हणाले की, त्यांना भानामतीची करामत येते ज्यातुन सोन्याची दागीने व रक्कम दुप्पटीने करुन मिळते याला भाळुन (अमिष) सर्जेराव खंडागळे यांनी त्यांच्या बोटातील ३८ हजार, ७५०रु किंमतीची ५ग्राम वजनाची अंगठी व खिश्यातील ६००रुपये भामटच्यांच्या हात रुमालावर सांगीतल्या नुसार ठेवले. यानंतर भामट्यांनी त्यांना काही क्षणासाठी डोळे बंद करण्यास सांगितले त्या प्रमाणे डोळे बंद केले असता भामटे नमुद अंगठी व रक्कम घेऊन पसार झाले. पिशवीत ठेवलेल्या रुमालात काहिच नसल्याचे दिसुन आल्याने फसवणुक केल्याच लक्षात आल्याने फिर्यादी वरुन दोन अज्ञात आरोपीं विरोधात भान्यासं २०२३चे कलम ३१६ (२), ३१८(४), ३ (५) अन्व ये गुन्हा दाखल करून पोलीसांचा तपास जारी आहे. अश्या प्रकारच्या तीन घटना घडल्या आहेत पण एकाही प्रकरणाचा यशस्वी तपास करण्यात यश मिळाले नसल्याचे दिसत आहे त्यामुळे माजलगाव शहर पोलीसांना भामट्यांनी आव्हान दिले असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्तहोत आहेत.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)